# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे-४११ ००७
फॅक्स : ०२० - २५६०१२०६
Website : www.unipune.ac.in
e-mail : coe@unipune.ac.in

*दूरध्वनी क्रमांक :*
*०२०-२५६०१२१८*
*०२०-२५६०१२०६*

**संदर्भ : परीक्षा-समन्वय/**316 **दिनांक : १५/०३/२०१७**

**तातडीचे व महत्वाचे**

प्रति,
१. मा. पोलीस आयुक्त,
पुणे शहर/नाशिक शहर

२. मा. पोलीस अधिक्षक,
पुणे जिल्हा/अहमदनगर जिल्हा व नाशिक जिल्हा

विषय : विद्यापीठ परीक्षा मार्च/एप्रिल/मे, २०१७ सत्र.

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध परीक्षा पुणे शहर, पुणे जिल्हा,नाशिक शहर, नाशिक जिल्हा, अहमदनगर शहर व अहमदनगर जिल्हयातील अनेक परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात येतात.

सन २०१७ च्या प्रथमार्धात होणाऱ्या विद्यापीठाच्या लेखी परीक्षा दिनांक २१/०३/२०१७ पासून सुरु होत आहेत. या परीक्षा विद्यापीठाची संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांमधून जवळपास ३०० परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात येत आहेत.

विद्यापीठामार्फत मार्च/एप्रिल/मे, २०१७ या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या निरनिराळया परीक्षांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. तसेच संबंधित परीक्षा केंद्रेही जाहीर केलेली आहेत. सदर परीक्षांची कार्यक्रमपत्रिका (विद्यापीठ परिपत्रक ३९१/२०१६) या पत्रासोबत अवलोकनार्थ, माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी व संदर्भासाठी पाठवीत आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा अत्यंत शिस्तबध्द व निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी संबंधित परीक्षा केंद्र प्रमुख, प्राचार्य/वरिष्ठ पर्यवेक्षक यांना तसेच विद्यापीठाला पोलिस विभागाची यापूर्वी आवश्यकतेनुरुप मदत झालेली आहे, तशीच मदत सन २०१७ च्या प्रथमार्धात होणाऱ्या विद्यापीठाच्या निरनिराळया परीक्षांच्या आयोजनाचे वेळीही उपलब्ध व्हावी म्हणून आपणास हे पत्र पाठवित आहे.

तरी कृपया विद्यापीठाच्या उपरोक्त परीक्षा चालू असेपर्यंतच्या कालावधीत शहरांच्या व जिल्हयातील संबंधित परीक्षा केंद्राच्या ठिकाणी तसेच परीक्षा केंद्रांचे केंद्र प्रमुख, प्राचार्य व वरिष्ठ पर्यवेक्षक यांना गरजेनुसार पोलिस मदत उपलब्ध करुन द्यावी व तशा सूचना आपल्या विभागातील सर्व संबंधितांना द्याव्यात अशी विनंती आहे.

विद्यापीठाच्या निरनिराळया परीक्षा सुरळीत आणि शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी आपण विद्यापीठास वेळोवेळी सहकार्य केलेले आहेच, ते यापुढेही मिळत राहील असा मला विश्वास आहे.

कळावे,

(डॉ. अशोक चव्हाण)
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत - वरीलप्रमाणे

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना -:

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये
२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था
३. मा. विभागप्रमुख, विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.

विद्यापीठ परीक्षांचे आयोजन व्यवस्थित व निकोप वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची/संस्थेची आहे. याकरिता आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त नजिकच्या पोलीस चौकीकडून उपलब्ध करुन घेण्यात यावा. महाविद्यालयामध्ये/संस्थेमध्ये पोलीस बंदोबस्ताची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाची राहील.